राज्य क्रीडा विकास निधी
उपसमिती गठित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : क्रीविनी २५१६/प्र.क्र.९२/क्रीयुसे -३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २३ ऑक्टोबर, २०१७.

वाचा:-

१) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र:- राक्रीधो २००२/प्र.क्र.९३/क्रीयुसे-१ दि. ३ सप्टेंबर, २००३.

प्रस्तावना: -

राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना व संवर्धन परिणामकारक करण्याच्या दृष्टीने राज्यात क्रीडा सुविधा विकसित करणे, राज्यातील दर्जेदार खेळाडूंना परदेशी क्रीडा मार्गदर्शकांची सेवा उपलब्ध करुन देणे व राज्यातील आंतरराष्ट्रीय खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणे, प्रशिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे तसेच क्रीडा विषयक विविध उपक्रम परिणामकारक राबविणे याकरिता संदर्भाधीन शासन निर्णय दि. ३ सप्टेंबर, २००३ अन्वये राज्य क्रीडा विकास निधीची स्थापना करण्यांत आली आहे. दि. १४ जुलै, २०१७ रोजी मा. मंत्री (शा.शि. व क्री.वि.) यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार मा. मंत्री (शा.शि. व क्री. वि.), प्रधान सचिव (शा.शि. व क्री.वि.) व आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या त्रिसदस्यीय समितीपुढे, आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे प्राप्त झालेले प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यासाठी व त्यानुषंगाने निधी वाटप करण्यामध्ये एकसूत्रता येण्यासाठी एक उपसमिती गठित करण्यांची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य क्रीडा विकास निधीचा शासन निर्णय दि. ३ सप्टेंबर, २००३ च्या अनुषंगाने आयुक्त, कीडा व युवक सेवा यांच्याकडे प्राप्त झालेले प्रस्ताव त्रिस्तरीय समितीस सादर करण्यासाठी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे उपसमिती गठित करण्यांत येत आहे.

उपसमिती		
अ.क्र	**पदाधिकारी**	**सदस्यत्व**
१	आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे	अध्यक्ष
२	उपसचिव, क्रीडा व युवक कल्याण	सदस्य सचिव
३	सहसंचालक, क्रीडा व युवक सेवा	सदस्य
४	श्रीम. शितल महाजन (पद्मश्री पुरस्कार्थी)	सदस्य

५	श्री. प्रविण ठिपसे (शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारप्राप्त- खेळाडू)	सदस्य
६	श्री. मनोहर साळवी (शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारप्राप्त- संघटक)	सदस्य
७	श्री. प्रशांत देशपांडे (महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन प्रतिनिधी)	सदस्य

२. उपरोक्त सदस्यांचा कार्यकाल वर्षापुरता मर्यादित राहील. या समितीच्या सदस्यांना (शासन सेवेत नसल्यास) वित्त विभाग शासन निर्णय क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५ दि. ३ मार्च, २०१० मधील मुद्दा क्र. १२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील. त्यामुळे बैठकीसाठी वेगळयाने मानधन अनुज्ञेय रहाणार नाही. सदर उपसमितीवर होणारा खर्च २२०४, क्रीडा व युवक सेवा, १०४ (०१) क्रीडा परिषद, (०१)(०१)महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद (अनिवार्य) (२२०४ १५४२), ११ देशांतर्गत प्रवास खर्च, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखालील प्राप्त तरतुदीतून भागविण्यांत यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२३१६०६०७२०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2017.10.23 15:55:49 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा)यांचे खाजगी सचिव

२) मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे.

४) सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा (संचालनालयामार्फत)

५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर.

६) महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र १ व २, मुंबई/नागपूर.

७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (संचालनालयामार्फत)

८) वरीष्ठ कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, पुणे (संचालनालयामार्फत)

९) सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, (संचालनालयामार्फत)

१०) सर्व जिल्हाधिकारी (संचालनालयामार्फत)

११) राज्य समन्वयक नेहरु युवा केंद्र (संचालनालयामार्फत)

१२) संबंधित अशासकीय सदस्य (संचालनालयामार्फत)

१३) निवडनस्ती, क्रीयुसे-३